**प्रेसनोट** दि. २५/०६/२०२१

वन परिक्षेत्र कार्यालय, कर्जत येथील वनरक्षक यांना अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने लाच स्विकारतांना केली अटक :—

| | | |
|---|---|---|
| अॅन्टी करप्शन ब्युरो/घटक | :— | ठाणे |
| गुन्हा नोंद कमांक | :— | कर्जत पोलीस स्टेशन, जि.रायगड, गु.रजि.नं.१९१/२०२१, भ्र.प्र.अधि. १९८८(संशोधन २०१८)चे कलम ७ प्रमाणे. |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | :— | आलोसे श्री.अंगद विठ्ठल नागरगोजे, वय—३२ वर्षे, व्यवसाय—नोकरी वनरक्षक, वन विभाग, वन परिक्षेत्र कार्यालय, कर्जत वन परिक्षेत्र कार्यालय, कर्जत, जि.रायगड |
| मागितलेली लाचेची रक्कम | :— | ५०००/—रू. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | :— | तडजोडीअंती ४०००/—रू.लाचेची रक्कम स्विकारली |
| थोडक्यात हकीगत | :— | यातील तक्रारदार यांची पत्नी यांच्या नावावर मौजे— भिसेगांव, येथे सीटीएस नं.४४३ ही मिळकत असून सदर मिळकतीमध्ये काही झाडे आहेत. तक्रारदार यांना सदर मिळकत विकसित करावयाची असल्याने मिळकतीमधील झाडे काढणे गरजेचे आहे. त्याकरिता त्यांनी वन विभागात अर्ज केला असता त्यांना त्यांची मिळकत ही कर्जत नगरपालिका हद्दीत येत असल्याचे वन विभागाकडून उत्तर देण्यात आले. परंतु आलोसे नामे श्री. अंगद विठ्ठल नागरगोजे, पद— वनरक्षक हे तक्रारदार यांना भेटून जर त्यांनी झाडे तोडली तर त्यांचेवर कारवाई करण्याची भिती दाखवून ४०००/— रूपये लाचेची मागणी केली होती. त्यामुळे तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांचेकडे दि. २३/०६/२०२१ रोजी तक्रार नोंदवली होती.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २३/०६/२०२१ व दिनांक २४/०६/२०२१ रोजी पडताळणी केली असता नमूद लोकसेवक यांनी ५०००/—रू.लाचेची मागणी करून तडजोडीअंती ४०००/—रू. लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाल्यावरून अेसीबी ठाणे युनिटने सापळयाचे आयोजन करून लोकसेवक आलोसे श्री.अंगद विठ्ठल नागरगोजे, वय—३२ वर्षे, व्यवसाय—नोकरी वनरक्षक, वन विभाग, वन परिक्षेत्र कार्यालय, कर्जत वन परिक्षेत्र कार्यालय, कर्जत, जि. रायगड यांना तक्रारदार यांचेकडून तडजोडीअंती ४०००/—रू. लाचेच्या रक्कमेचा स्विकार केल्यानंतर दिनांक २४/०६/२०२१ रोजी तक्रारदार यांच्या राहते घराच्या खाली असलेल्या कार्यालय भिसेगांव, न्यु बिकानेर स्वीट मार्ट जवळ, ता.कर्जत, जि.रायगड येथे रंगेहात पकडण्यात आले आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी— मा.श्री.डॉ.पंजाबराव उगले, सो.पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

१) संपर्क पत्ता :— लाप्रवि, ठाणे मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
२) संकेत स्थळ :— acbmaharashtra@mahapolice.gov.in
३) ई—मेल आयडी :— spacbthane@mahapolice.gov.in
४) अॅप्लीकेशन :— acbmaharashtra.net
५) टोल फ्री क्र. :— १०६४ ६) दुरध्वनी क्रमांक :— 022-20813599

(पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे — शिक्का)

सुषमा ध्रुवराव पाटील
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

Scanned with CamScanner